Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# निसर्गकन्या बहिणाबाई चौधरी यांच्या सामाजिक कविता

**जयश्री रमेशराव देशमुख,** संशोधक स्नातकोत्तर मराठी विभाग, रा. तु. म. ना. विद्यापीठ, नागपूर
**डॉ. देवयानी चव्हाण,** मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख, गो. से. अर्थ-वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

**गोषवारा (Abstract)**

साहित्य आणि समाज यांचा संबंध अनन्यसाधारण आहे. साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब आहे. समाजाशी असणारे ऋणानुबंध साहित्यात आपणास पहावयास मिळते. माणसाला घडविण्याचे कार्य साहित्य करते. मानवी भावभावना,संवेदना, सुखदुःख यांची गुंफण आपण साहित्यात अनुभवत असतो. जीवनातील संघर्षाला उभी ठाकणारी व दुःखाच्या डोंगराला हसत पार करणारी, आयुष्यात येणाऱ्या अडचणींचा सामना करून अगदी साध्या भाषेत तत्त्वज्ञानाची व्याप्ती सांगणारी अशी ही बहिणाई. मराठी साहित्यात निसर्गकन्या, भूमीकन्या या नावाने नावलौकिक पावलेली 'बहिणाबाई चौधरी' या आपल्या कवितांनी अजरामर झालेल्या आहेत. एखाद्या शिक्षित महिलेने यशाचे उंच शिखर गाठणे हे निर्विवाद, पण अक्षराची ओळख नसलेल्या महिलेला साहित्यात नावलौकिक मिळणे म्हणजे अशक्यप्राय काम होय. निरक्षित महिलेने अक्षराचा मळा फुलवून त्यात काव्याचे पीक काढले व समाज, संस्कृती, तत्त्वज्ञान या तिन्ही गोष्टींचा मेळ घालून साध्या-सोप्या बोली भाषेचा वापर करून मराठी साहित्यात मानाचा तुरा मिळविला. ‘कलावंत हा जन्मावाच लागतो, तो बनविता येत नाही’ या उक्तीचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे बहिणाबाई.साध्या, सोप्या भाषेत जीवनाचा अर्थ त्यांनी समजावून सांगितला. त्यांच्या कविता ह्या सहज फुलून जातात.

**सूचनक शब्द (Keywords) :- सामाजिक आशय, समाजवास्तव, मानवी समाज, संस्कृती.**

## विषय विवेचन

मानवी समाजाच्या संस्कृतीच्या इतिहासात ‘कविता’ अथवा ‘काव्य’ या वाङ्मयप्रकाराचे स्थान मूलभूत व मध्यवर्ती स्वरूपाचे राहिलेले आहे. भारतीय व पाश्चात्त्य या दोन्ही परंपरांमध्ये काव्य या आकृतीबंधाचे प्राचीनांपासून अर्वाचीनांपर्यंत अनेक मीमांसकांनी विविध अंगी स्वरूपाचे चिंतन मांडलेले पहावयास मिळते. भारतीय विसाव्या शतकारंभी 'आधुनिक' किंवा ‘अर्वाचीन’ ही संज्ञा नव्या मराठी काव्य प्रवाहाला लावली गेली.’मराठी कविता’ ही मराठी संस्कृतीचा प्रवाह अंतरंगात घेऊन वाहणारी विशाल अशी वाङ्मयधारा आहे. कविता हा साहित्यप्रकार मनाला आनंदमय करतो. मानवी संवेदना,भावभावनांचे चित्र काव्यात उतरविले जाते. आधुनिक मराठी ग्रामीण कवितेचा प्रवाह हा मराठी साहित्य विश्वातील महत्त्वाचा साहित्य साठा ठरलेला आहे. सामाजिक जाणीवांचा क्लिष्टपणा, तर दुसरीकडे ग्रामीणतेत आढळणारा सच्चेपणा या कवितांचा गाभा आहे. ग्रामीण कवितांचा विचार केल्यास ‘बहिणाबाईची गाणी’ हा कवितासंग्रह माणसाच्या मनाला अलगद स्पर्श करतो. या कवितासंग्रहांनी मराठी ग्रामीण कवितेला मराठी साहित्यात वेगळे स्थान निर्माण करून दिले. आपल्या साध्या, सोप्या भाषेत जीवनाचे तत्त्वज्ञान मांडणारी व समाजाच्या सर्व चालीरीतीतून शब्दाला जोपासणारी कवयित्री बहिणाबाई चौधरी हिने मराठी साहित्यातून आपली वेगळी ओळख निर्माण केली.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

बहिणाबाईची कविता ही खऱ्या आणि संपूर्ण अर्थाने ग्रामीण कविता आहे. बहिणाबाई चौधरी यांचा जीवन प्रवास पाहिला तर तो आपल्याला त्यांच्या कवितेतून जाणवतो. साधी,सोपी भाषा जी प्रत्येक वाचकाला आपलीशी वाटते.

किंबहुना या कवितेत असणारा आशय प्रत्येक माणसाला आपल्या जीवनातील सुखदु:खाशी समरस असलेला दिसतो. बहिणाबाई चौधरी यांचा जीवनपट पाहिला तर त्या खानदेशी कन्या. बहिणाबाई यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव पासून ६ कि.मी. अंतरावरील आसोदे गावातील प्रतिष्ठित महाजनांच्या घरी झाला. त्यांच्या आईचे नाव भिमाई व वडिलांचे नाव उखाजी महाजन होते.त्यांना तीन भाऊ घमा, गणा आणि घना, तसेच तीन बहिणी अहिल्या,सीता आणि तुळसा. वयाच्या तेराव्या वर्षी बहिणाबाईचा जळगावातील नथ्थूजी चौधरी यांच्याशी विवाह झाला.सासरी संयुक्त कुटुंब होते.बहिणाबाईंना सासरी स्नेह लाभले,पण तारुण्यातच त्यांना वैधव्य आले. सुरुवातीला असणारे संयुक्त कुटुंब विभक्त झाले. नवऱ्याच्या अकाली निधनाने कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. पदरात एक कन्या काशी आणि दोन पुत्र सोपान आणि ओंकार यांच्यावर त्यांनी चांगले संस्कार केले. ऐन उमेदीच्या म्हणजे वयाच्या तिसाव्या वर्षीच बहिणाबाईंना वैधव्य आले. त्यातच जळगावात प्लेग हा साथीचा रोग ओंकारला झाल्यामुळे त्याला अपंगत्व आले. जीवनातील सर्वात खडतर प्रवासाला बहिणाबाईंनी आता सुरुवात केली. पण ती कुठेही न डगमगता त्या प्रवासाची व आपल्या संसाराची जबाबदारी पार पाडत होती. अतिशय वाईट परिस्थितीतही तिने संयमाने तोंड दिले. जीवनाच्या प्रत्येक वळणावर बहिणाई मोठ्या हिमतीने चालत होती. नवऱ्याचे दु:ख मनाशी ठेवलेलेच असताना, मुलाला झालेला आजार व अपंगत्व अशा वज्र प्रहाराने ती खचली नाही तर ती स्वबळावर चालत राहिली. काव्याचा उगम दु:खाने होते हे बहिणाबाईच्या काव्यातून जाणवते. पण दु:खाला परतविण्याची जिद्द हेही बहिणाबाईच्या काव्यातून त्यांचा प्रतिबिंबित होते.

बहिणाबाईच्या कवितेचा कालखंड हा १९व्या शतकाच्या अखेरीचा आणि २० शतकाच्या सुरुवातीचा काळ. ज्या समाजात त्या जन्मल्या तो लेवा पाटील होय. या समाजातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. त्यांचे दैनंदिन जीवन विवाह अशा बऱ्याच चालीरीती सारख्याच आहेत. ३०० वर्षांपूर्वी हा समाज तापी नदीच्या काठा-काठाने स्थलांतरित झाला आणि जिथे जिथे चांगल्या जमिनी होत्या तिथे वसला.

पूर्व खानदेश म्हणजे जळगाव, रवीर, यावल, भुसावळ, एदलाबाद, एरंडोल, अमळनेर, चाळीसगाव इत्यादी तालुक्यांचा भाग.पश्चिम खानदेश म्हणजे धुळे, साखरी, सिंदखेड, शिरपूर, शहादे, नंदुरबार, अकरानी इत्यादी तालुक्यांचा भाग. हे दोन्ही भाग जळगाव व धुळे म्हणून ओळखतात. अमरावती, बुलढाणा, वर्धा, नागपूर, चंद्रपूर या भागातही तुरळक हा समाज आहे. इथे अनेक जाती-जमाती आहेत. उदा.गुजर, मराठी,माळी,गुजराती, ब्राह्मण आणि इतर बारा बलुतेदारांचा समाज आहे, दर बारा मैलांवर बोलीभाषा बदलत जाते. खानदेशी भाषेचा उल्लेख वऱ्हाडी खानदेशी किंवा अहिराणी खानदेशी असा आढळतो परंतु प्रत्यक्षात खानदेशी वऱ्हाडी व अहिराणी या दोन स्वतंत्र बोली आहेत.

खानदेशी, वऱ्हाडी, अहिराणी पेक्षा प्रमाण मराठी भाषेच्या जवळच्या तर अहिराणी ही साधारणता मराठी, गुजराती, हिंदी यांचे मिश्रण असलेली आहे.ह्या समाजात बोलली जाणारी जी खानदेशी बोली बहिणाबाई बोलत होती ती सुद्धा तापी नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर पसरलेल्या लेवा पाटीदार समाजात बोलली जाते. ती अलीकडच्या किनाऱ्यावर वेगळी आणि नदीच्या पलीकडच्या किनाऱ्यावर थोडी वेगळी बोलतात.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

आपण बहिणाबाईच्या कवितेतील सामाजिक आशयाचा विचार करतो तेव्हा त्या कवितेतील आशय हा त्या समाजातील चालीरीती यावर आधारलेला दिसतो. माणूस हा समाजशील प्राणी आहे समाजाशिवाय तो राहू शकत नाही समाजातील चालीरीती, प्रथा, परंपरा, संस्कृती यांचा प्रभाव हा माणसाच्या जडणघडणीवर पडत असतो. ज्या समाजात बहिणाबाई घडल्या त्या समाजाचे बहिणाबाईच्या कवितेवर प्रतिबिंब पडलेले दिसते. लेवा पाटीदार या समाजातील बांधव हे एकोप्याने आणि अगदी साधेपणाने आपल्या चालीरीती पार पाडतात, याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांच्याकडील लग्नकार्य. लग्नकार्यातील जेवण पद्धती पाहिल्यास आपणास फार आश्चर्य वाटेल. बहिणाबाईच्या काळात तर स्त्रियांच्या जीवनात जास्त प्रमाणात कष्ट होते. संपूर्ण कुटुंबाला लागणारे पीठ रोज जात्यावर दळावे लागायचे, स्त्रियांचे जीवन अतिशय कष्टमय होते.

स्त्री म्हणून समाजात जगताना अनेक गोष्टींचा तिला स्वीकार करावा लागतो. स्त्रीला शोशिकतेचे गुंफण आयुष्यभर जोपासावे लागते. समाजातील चालीरीती पुरुषाने पाळल्या नाही तरी स्त्रीला ते पाळावेच लागते. विसाव्या वर्षी वैधव्य प्राप्त झालेल्या बहिणाबाईंनी तीन मुलांना घेऊन त्यांचा सांभाळ करत आयुष्य काढले तेच एक पुरुष काढू शकेल काय? हे आपण सांगू शकत नाही. बहिणाबाई ही एक स्त्री म्हणून नाही तर आई म्हणून तिने प्रत्येक कर्तव्य पार पाडले पण असे कष्टमय जीवन जगताना तिला माहेरची, तिथल्या वाटेची फार आठवण येत असे. त्यातूनच 'माहेर' आणि 'माहेरची वाट'ही कविता साकारलेली आहे. बहिणाबाईला तिच्या वडिलांचा फार अभिमान आहे असे त्या म्हणतात.

“बापाजीच्या हायलीत — येती शेट-शेतकरी
दारी खेटराची रास — घरी भरली कचेरी
गावामधी दबदबा — बाप महाजन माझा
त्याचा कटीतील न्याय — जसा गावामधी राजा
माय भिमाई माऊली — जशी आंब्याची साउली
आम्हाइले केलं गार — सीता उन्हात तावली”

बहिणाबाईला आपल्या आई-वडिलांचा फार जिव्हाळा होता. त्यांना त्यांच्या वडिलांचे वैभव आठवते. त्यांच्या घरी येणारे शेट शेतकरी, दारी वडनीरे चपले जोडे, गावात न्याय निवाडा करणारे त्यांचे वडील महाजन आणि आई भिमाई ही जणू काही उन्हात आंब्याच्या सावलीप्रमाणे आहे. अशी माहेरच्या माणसाच्या आठवणीतील त्यांचे काव्य मायेने आठवणीने ओले चिंब होते. त्याचप्रमाणे माहेरची वाट ही त्यांना सतत खूणावत राहते.

“आज माहेराले जाणं — झाली झाली वो पहाट
आली आली डोयापुढे — माझ्या माहेराची वाट
रात-दिन गजबज — असं खटल्याचं घर
सदा आबादी आबाद — माझं आसीद माहेर”

त्या म्हणतात,आज माझ्या माहेराला जाणे आहे, सूर्योदय झाला आहे, माझ्या डोळ्यापुढे माहेराची वाट दिसत आहे.त्यांनी आपल्या वडिलांच्या घराला 'खटलं'असे संबोधले आहे.त्यांनी आपल्या आसोद या गावी सगळीकडे समृद्धी आहे.असा माहेरचा गोडवा बहिणाबाई सांगतात. जे प्रेमाने सोडून जावे लागते त्याची गोडी आणि आकर्षण फक्त अनुभवानेच समजू शकते, अन्यथा नाही.त्यांना त्यांच्या माहेरच्या वाटेवर असलेली लौकी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

नदी, वाटेवरची पिवळी पिवळी चिकन खारी माती, जी पावसाळयाच्या आधी लोकांच्या मातीच्या छपरांवर जाऊन बसते, पावसाचे पाणी तर शोषतेच, पण उन्हाळयातही थंडावा देते, बाभळीची बने या सर्वांची आठवण देते.नुसता माहेरचा गोडवा बहिणाबाई गात नाही तर सासरच्या वाटेवर असणारा गोडवाही ती तितक्याच उदात्तपणे म्हणते.बहिणाबाई सासर-माहेर यांची उत्तम अशी सांगड घालते व या दोन्ही नात्याला जीवापाड जपते.

माहेर आणि सासर यांना जपत बहिणाबाईंनी संसार केला व या संसारातले सुख-दुःख हे आपल्या काव्यातून व्यक्त केले.

“अरे संसार संसार
जसा तवा चुल्ह्यावर
आधी हाताले चटके
तव्हा मिळते भाकर”

त्यांनी अगदी साध्या, सोप्या सुलभ भाषेत संसाराचे गुपित उलगडले आहे.ज्याप्रमाणे तवा तापल्यावरच, हाताला चटका लागल्यावरच भाकर मिळते, त्याप्रमाणे संसारात सुख-दुःख आल्याशिवाय संसाराचा गाडा पुढे जाऊ शकत नाही हे अंतिम सत्य आहे.

“अरे संसार संसार
नही रडणं कुढणं
येड्या गळयातला हार
म्हणू नको रे लोढनं”

असा अगम्य विचार बहिणाबाईने या कवितेत उलगडून दाखवला.संसार हा रडणं किंवा दुःख करण्यासाठी नसून दोन्ही लोकांनी मिळून प्रत्येक संकटावर मात करण्यासाठी असतो हा संदेश सरळ साध्या भाषेत त्या समजावतात.

बहिणाबाई यांच्या काळात घरीट (जातं)यांच्याशी असलेले नातं त्यांनी आपल्या कवितेत मांडलेले आहे.

“अरे जोडता तोडलं
जात्यातून येत पीठ
माझा घरीट घरीट
दाणे खाये मूठ मूठ

त्याले नातं म्हणू नही
त्याले जातं म्हणू नही
दोन दाढा दोन व्हीट
त्याच्यातून गये पीठ”

“अरे घरोटा घरोटा
तुझ्यातून पडे पीठी
तसं तसं माझं गाण
पोटातून येत व्हटी”

बहिणाबाईंचे व जात्याचे अर्थात घरोट्याचे वेगळेच नाते निर्माण झाले होते. सामान्य माणसासाठी ते नुसते घरोटे होते.पण बहिणाबाईचे ते हितगुज करण्याचे साधन होते.भल्या पहाटे घरोट्याची घरघर चालायची, त्यासोबत बहिणाबाई तिच्या अंत मनातील चालणारा विचार बोलून दाखवायची.त्यातच तिचे व घरोट्याचे नाते हे केंव्हा जवळीकतेचे झाले हे तिलाही समजले नाही.या जवळीकतेतूनच जीवनाच्या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

समरसतेचे काव्य फुलत गेले. किंबहुना असेही म्हणता येईल, साध्या निर्जीव वस्तूत सजीवतेच्या जाणिवा निर्माण करणारी बहिणाबाई ही खरी ग्रामीण कवितेची जनक ठरली. घरातील कामात रमणारी, साध्या सोप्या भाषेत जीवनाचा अर्थ सांगणारी कवयित्री ठरली.ज्याप्रमाणे मानवी नाते जोडले की ते तोडता येत नाही, त्याप्रमाणे या जात्यातून पीठ येते म्हणून त्याला 'जाते' म्हणू नये असे बहिणाबाई म्हणतात.जात्याच्या घर घरीतून तिला सूर एकू येतात आणि या सुरातूनच गाण्याचा जन्म होतो.म्हणूनच बहिणाबाई म्हणतात

"अरे जात्या तुझ्या पोटातून पीठ बाहेर पडते,
तसे माझ्या पोटातून गाणे ओठावर येते रे!"

अगदी साधी कल्पना पण यातून हे काव्य जन्माला येते.तिच्या प्रतिभेचे वैभव आपल्याला जाणवते.साधी सरळ स्त्री, तिच्या रोजच्या कामातून सुलभतेने विलक्षण अनुभवाचे सार उलगडत जाते. संसारातील साधनाशी घरोट्याशी बोलता बोलता समाजातील लोकांनाही त्या आपल्या मनातील गोष्टी सांगतात. जीवनातील आलेल्या अडचणीशी सामना कसा करायचा हे त्या स्वतः मधल्या वाटसरुला धीर देऊन, उपदेश करतात.संसाराची वाट मोठी बिकट आहे बरं!

“मतलबाचे धनी सर्वि माया रे खोटी
वाटच्या वाटसरा, वाट बिकट मोठी!
वाऱ्याचं वाहदन आलं आलं रे मोठं
त्याच्यात झुकीसनी चुकू नको रे वाट
दोन्ही बाजूनं दर्या धर झुडुप हाती
सोडू नको रे धीर येवो संकट किती
येऊ दे परचीती काय तुझ्या ललाटी
वाटच्या वाटसरा वाट बिकट मोठी!”

बहिणाबाई चौधरी ही निरक्षर स्त्री पण तिचे तत्त्वज्ञान पाहून आपण अचंबित होतो.जीवनातील अनुभवाचे ज्ञान हे सर्वोच्च आहे. तिला आलेल्या दुःखाचा तिने कधीही उहापोह केला नाही, तर प्रत्येक संकटाला धीराने पुढे जाण्याचा सल्ला तिने माणसाला दिला. समाजापुढे नवीन आदर्श निर्माण केला. बहिणाबाईंनी सांगितले की, सर्व मतलबासाठी लोक जवळ येतात.पण कामाच्या वेळेस आपल्यालाच करावे लागते. म्हणून आयुष्यातील जीवनवाट कितीही खडतर असली तरी, कितीही मोठे वादळ आले तरी, कोसळून पडायचे नाही. तर त्या संकटाचा सामना करायचा.हिमतीने पुढे चालायचे.असे केल्यास आपल्याला नवीन मार्ग मिळतो.कितीही कठीण प्रवास असला तरी तो पार पडतोच, ही मोठी शिकवण बहिणाबाई संपूर्ण मानवजातीला देऊन जाते.अशा या समाजात स्त्रीला काम करण्यासाठी असणारे यंत्र असे मानतात.तिला कायम कामातच राम मिळतो.खेड्यापाड्यात सणासूदिला वेगळे स्थान आहे.बहिणाबाईच्या खानदेशात अक्षयतृतीयेचा ‘अखजीचा’ सण मोठ्या आनंदात साजरा केला जातो.समाजातील चालीरीती, परंपरा, रुढी या वेगवेगळ्या असतात.खानदेशात अक्षयतृतीयेला मुलींना माहेरी आणले जात असत. वैशाख शुद्ध तृतीयेला अक्षय तृतीया सण साजरा केला जातो. सर्व मुली माहेरी जाऊन मोठ्या उत्साहाने हा सण साजरा करत.लिंबाच्या झाडाला दोर बांधून झोके टांगले जात होते.वेगवेगळे खेळ खेळून, गौराईची पूजा करून हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करत होते.बहिणाबाई उत्साहाने म्हणतात,

“माझा झोका माझा झोका | खेळतो वाऱ्यावर्हजी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

गेला झोका गेला झोका | चालला माहेराले
जी आला झोका आला झोका | पलट सासराले जी
जीवाची भूक सरेजी |भूक सरे भुक सरे
वाऱ्यानं पोटभरे जी | माझा झोका माझा झोका ||"

सासुरवाशींना माहेरचा आनंद देण्यासाठी हा सण म्हणजे मोठी पर्वणीच होय.समाजातील या चालीरीती माणसाला चैतन्य देत असतात.जीवनातील चढ उतारा सोबतच हे सण समारंभ माणसाच्या रोजच्या जीवनशैलीला नावीन्य देऊन आनंदाची शिदोरी आठवणीच्या स्वरूपात देते. माहेराला आलेली स्त्री चार दिवस राहून आनंदाची शिदोरी सासरी नेते. बहिणाबाई आपल्या काव्यात तत्कालीन समाजाचे रूप मांडते. पहिलेच्या काळी स्त्रीला सासरी बऱ्याच त्रासाला समोर जावे लागे. सुनेनी कामच करावे असे तेव्हा घरातल्या वडीलधाऱ्यांना वाटे. त्यामुळे सासुरवाशी ही स्त्रीला लागलेले विशेषण होय .सासु सुनेच्या नात्यातील गोडवा टिकावा म्हणून  बहिणाबाई म्हणतात,

"उठ सासुरवाशीन बाई | घे सोशीसन घे |
घालू नको वो वाद | कर माहेराची याद |"

तिला आपल्या माहेरची आठवण करून, तू वाद घालू नकोस कारण तुझ्या आई-वडिलांनी तुला वाद घालणे नव्हे तर सोशिकपणा शिकवला आहे. याची आठवण करून देते.यात बहिणाबाईच्या काळातील समाज व्यवस्था कशी होती, याची जाणीव आपणास होते.

बहिणाबाई ही शेतकरी कन्या होती. तर ती एका शेतकऱ्याची पत्नी होती. त्यामुळे शेतीवर, काळया मातीवर असलेली माया आपणास पाहावयास मिळते. मातीशी, मातीत राबणाऱ्या माणसांशी तिचे ऋणानुबंध होते. निसर्गातील प्रत्येक गोष्टीशी तिने आपले स्नेहबंध जोडलेले होते. त्यात पशु, पक्षी ही आलेच.अशाच शेतकऱ्यांचे जिवाभावाच्या सखा बैल आणि या बैलावर असलेले आपले उपकार फेडण्यासाठी कृतज्ञ म्हणून शेतकरी 'पोळा' हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतो. बैल हा शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा आहे. म्हणूनच त्याला एक दिवस विश्रांती द्यावी.त्याचा सन्मान करण्याचा हा दिवस बहिणाबाई सर्वांना सांगतात की, तुमच्या हौसेसाठी बैलाची शर्यत लावू नका.

"व्हते आपली हाऊस |आन बैलाले तरास
आता पुंजा रे बैलाले |फेडा उपकाराचं देणं
बैला खरा तुझा सण| शेतकऱ्या तुझं होनार!"

बहिणाबाई म्हणतात, बैलाला शंकराचा नंदी म्हणून मान आहे. नाहीतर कष्ट करणारा बैल व कष्ट घेणारा शेतकरी यात फरक  काय राहिला? असा हा शेतकऱ्यांनी बैलासाठी त्याचे उपकार मानण्यासाठी साजरा केलेला सण पोळा.अशा कितीतरी कविता जीवनाची वेधकता दर्शवितात.त्या कवितेत तिच्या प्रतिभेचे, जीवनदृष्टीचे, समर्पकतेचे दर्शन तर घडवितातच.पण आपल्या तत्कालीन समाजातील चालीरीती, परंपरेचे, मानसिकतेचे व्यापक स्वरूपातील दर्शन ही घडवितात.

**निष्कर्ष**

बहिणाबाईच्या कविता म्हणजे मराठी ग्रामीण कवितेला मिळालेला दागिना होय. ज्याप्रमाणे दागिना स्त्री सौंदर्याला अधिक फुलवीत असतो त्याप्रमाणे या अस्सल खानदेशी बोलतील कविता ग्रामीण कवितेच्या सौंदर्यात भर टाकते. खानदेशी बोली हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे. बहिणाबाई चौधरी यांना अक्षर ओळख


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

नसली तरी त्यांना जीवनातील चढउतारांची ओळख होती. आपला खडतर प्रवास पार करताना त्यांना मिळालेल्या अनुभवाचे समर्पक चित्रण त्यांच्या काव्यात पाहायला मिळते. स्त्रीविषयक तत्कालीन समाजाची स्थिती अत्यंत सोप्या भाषेत त्या मांडतात, स्त्रीला मिळालेल्या माहेर सासर या नात्याची विण त्या शब्दात फुलवितात. नाते कसे जपायचे याची शिकवण त्या देतात. समाजात असणाऱ्या चालीरीती, रुढीपरंपरा यावर त्या भाष्य करतात. या परंपरेतून माणसाचा स्वभाव वैशिष्ट्यालाही त्या स्पर्श करतात. समाज आणि माणूस यांचे संबंध अनन्यसाधारण आहे. समाज हा माणसाशिवाय असू शकत नाही. तसेच माणूस हा समाजाशिवाय राहू शकत नाही. याचे यथोचित विश्लेषण बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातून घडलेले आपणास दिसते. अशा ह्या असा धरण तेजस्वी कवयित्रीचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, तिचे विचार यातून जगण्याचे सामर्थ्य मिळते. दुःखातून सुखाकडे जाण्याचा मार्ग मिळतो. संघर्षातून आयुष्य घडविण्याची वाट मिळते आणि त्यांची कविता मनाला उत्साह देते.

**संदर्भग्रंथ सूची**

१. चौधरी स्नेहलता, ‘भूमिकन्या बहिणाबाई चौधरी एक चिंतन’, कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर, पुणे, प्रथमा आवृत्ती, २६ जून १९९४.
२. जगनाळे डॉ.रेखा, ‘निसर्ग कन्या बहिणाबाईचे काव्यशिल्प’, विजय प्रकाशन, नागपूर, २० फेब्रुवारी, २०२१.
३. नारखेडे डॉ.अरविंद कृष्णा,‘लेवा गण बोली-एक वास्तव’(बहिणाबाईची काव्य बोली), अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव.
४. पित्रे ऋता, ‘बहिणाबाईंची गाणी : एक अभ्यास’, म. रा. सा. स.,मुंबई, २००२.
५. भिरुड प्रमिला, ‘बहिणाबाईंची गाणी एक अभ्यास’, व्यंकटेश प्रकाशन, जळगाव, २००३.
६. यादव आनंद, ‘मराठी साहित्य आणि संस्कृती’, मेहता प्रकाशन, प्रथमावृत्ती, आक्टोंबर १९८५.
७. सारवेकर कैलास, ‘मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास’, मेहता पब्लिक सिंग हाऊस, ऑक्टोबर १९९९.


Copyright © | JET Network, All Rights Reserved